नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०९/२०२६ (मंगळवार)

..............................................................................................

## महीलेला मारहाण करून लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पो.स्टे. भिवापुर :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप क्र. ५६/२४ कलम ३७६, ३२४, ३४१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २८/०२/२०२४ रोजी यातील फिर्यादी ही शेतातुन घरी परत येत असतांना लोणार शेतशिवार, ता. भिवापुर येथे यातील आरोपी नामे **किसना श्रीराम नंदुरकर, वय ४० वर्षे, रा. नांद, ता. भिवापुर, जि. नागपुर** याने फिर्यादीचा रस्ता अडकवुन तु मला पुष्कळ दिवसांपासुन आवडते असे म्हणुन शारिरीक सबंधाची मागणी केली असता फिर्यादीचे त्याला नकार दिला. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला मारहाण करून तिला बेशुध्द करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

**श्री संदीप सडमेक, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन भिवापुर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक २२/०९/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्र १८ श्री जे. सी. यादव यांनी नमुद आरोपी किसना श्रीराम नंदुरकर वय ४० वर्षे, रा. नांद, ता. भिवापुर, जि. नागपुर याला कलम ३७६ भादवि मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व २५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ५ वर्षे सश्रम कारावास , कलम ३२३ भादवि मध्ये ६ महीने सश्रम कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीने सश्रम कारावास, ३४१ भादवि मध्ये १ महीने सश्रम कारावास व ५००/—रू दंड, दंड न भरल्यास ७ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री मयंक माधव, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर , प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन भिवापुर, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी श्रेणी पोउपनि तुलाराम खडसे ,पोलीस स्टेशन भिवापुर यांनी मदत केली आहे.

## बेकायदेशीर जमाव करून दंगल व मारहाण करणाऱ्या ५ आरोपींना मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— पोलीस स्टेशन वेलतुर येथे अप. क्र. १२४/२०२३ कलम ३२५,१४३,१४७,१४९,३४१ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०३/०८/२०२३ रोजी सायंकाळी १९.३० ते २०.०० वाजताच्या सुमारास, मौजा फेगड, ता. कुही, जि. नागपूर येथे फिर्यादी देवा ऊर्फ देविदास श्यामराव नाहटे, वय ३५ वर्षे, यांना आरोपी क्रं १) नामदेव भिवाजी राउत , २) कैलास बळीराम राउत ,वय ३१ वर्षे ३) सुखराम धर्माजी राउत, वय ५० वर्षे ४) शुभम जयवंत राउत, वय २६ वर्षे आणि ५) स्वप्नील बळीराम राउत, वय २७ वर्षे सर्व रा. फेगड, ता. कुही, जि. नागपूर यांनी बेकादेशिर दंगल करून फिर्यादीला मारहाण करून दुखापत केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

**तपासी अधिकारी श्री मनिराम भुरे, पोलीस नाईक , पोलीस स्टेशन वेलतुर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीतांविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २२/०९/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्र १८ श्री जे. सी. यादव यांनी नमुद आरोपी क्र १ ते ५ यांना कलम ३२५, १४९ भादंवि अन्वये प्रत्येकी ३ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी १०,०००/— दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास, तसेच कलम १४७ भादंवि अन्वये १ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/— दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री श्याम खुळे आणि श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री मयंक माधव,सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय

पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे , प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन वेलतुर, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी सफौ संतोष गुंटीवार, ब. नं २२६ पोलीस स्टेशन वेलतुर यांनी मदत केली आहे

## पारशिवणी पोलीस स्टेशन अंतर्गत बिटोली येथील ०२ बोगस डॉक्टरांवर गुन्हे नोंद ०२ आरोपी अटक ०३ लाख ५० हजारांचे साहित्य व औषधी जप्त

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि बेकायदेशीरपणे वैद्यकीय सराव करणाऱ्या बोगस डॉक्टरांविरोधात पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. तालुका स्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीच्या आदेशान्वये २१/०९/२०२६ रोजी बिटोली येथे वैद्यकीय अधिकारी, पोलीस प्रशासन आणि औषध निरीक्षक (ड्रग इन्स्पेक्टर) यांच्या संयुक्त पथकाने धाड टाकुन ०२ आरोपींवर ०२ गुन्हे नोंद केले आहे.

आरोपी क्र १) प्रेमानंद बुधराम पारधे, वय ४७ वर्षे, आणि आरोपी क्र २) योगेंद्र बुधनलाल चौहान वय ४५ वर्षे, दोन्ही रा. बिटोली, ता. पारशिवणी, जि. नागपुर हे दोन्ही आरोपी कोणतीही वैद्यकीय अर्हता किंवा नोंदणी परवाना नसताना बेकायदेशीरपणे ॲलोपॅथी वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याची माहीतीवरून बनावटी रुग्ण पाठवून खात्री केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी, पोलीस प्रशासन आणि औषध निरीक्षक (ड्रग इन्स्पेक्टर) यांच्या संयुक्त पथकाने धाड टाकली . चौकशीदरम्यान आरोपींकडे कोणतीही वैद्यकीय अर्हता (डिग्री) किंवा नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाही. तसेच दोन्ही आरोपींच्या क्लिनिकमधून ॲलोपॅथिक औषधे, सिरिंज, इंजेक्शन्स व वैद्यकीय साहित्य असा एकूण असा एकूण ३,५०,०००/— रुपये किंमतींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही आरोपी स्वत:ला नोंदणीकृत डॉक्टर भासवून गरजु रुग्णांकडून उपचाराच्या नावाखाली पैसे उकळून नागरिकांच्या आरोग्याशी खेळुन त्यांची फसवणूक करीत असल्याचे**

निष्पन्न झाले. वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारीवरून आरोपी क्र १) प्रेमानंद बुधराम पारधे,रा. बिटोली आणि आरोपी क्र २)योगेंद्र बुधनलाल चौहान, रा. बिटोली यांच्याविरुद्ध कलम ३१८(४) भान्यासं , अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २७, तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम १९६१ च्या कलम ३३(१) व ३३(२) अन्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. पुढील तपास पारशिवणी पोलीस करीत आहेत.

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयात रुट मार्च, मॉक ड्रिल व रेस्क्यू ऑपरेशनचे आयोजन

आगामी गणेश विसर्जन तसेच आगामी सण—उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत पोलीस यंत्रणेची तयारी तपासण्यासाठी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक २२/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात कळमेश्वर, खापा, मोहपा, कुही, वेलतुर आणि भिवापुर या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत रूट मार्च सह दहशतवादी अथवा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अँटी टेरर ड्रिल (**Anti-Terror Drill**) आणि प्रत्यक्ष रेस्क्यू ऑपरेशन चे (**Rescue Operation**) प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यामध्ये मुख्यालयातील अधिकारी आणि क्विक रिस्पॉन्स टीम (**QRT**) अंमलदार, पोलीस स्टेशन येथील पोलीस अंमलदार/कर्मचारी तसेच होमगार्ड सहभागी झाले होते.

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी कळमेश्वर यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच कळमेश्वर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

पोलीस स्टेशन खापा :— पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी खापा यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन खापा अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच खापा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

पोलीस स्टेशन मोहपा :— पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी मोहपा यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत ही कारवाई पार पडली. मोहपा येथील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

पोलीस स्टेशन कुही :— पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी, कुही यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन कुही अंतर्गत ही कारवाई पार पडली. कुही शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

पोलीस स्टेशन वेलतुर:—पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच वेलतुर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

पोलीस स्टेशन भिवापुर :— सहा पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी भिवापुर यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच भिवापुर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

वरील पोलीस स्टेशन अंतर्गत संवेदनशील आणि प्रमुख बाजारपेठांच्या भागातून पोलीस दलाचा शिस्तबद्ध रुट मार्च काढण्यात आला, ज्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आपत्कालीन किंवा दहशतवादी परिस्थिती उद्‌भवल्यास त्याला तात्काळ व प्रभावीपणे कसे तोंड द्यावे, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी नागरिकांचा बचाव कसा करावा, यासाठी रेस्क्यू ऑपरेशनचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आणि आपत्कालीन प्रसंगी पोलिसांची प्रतिसाद क्षमता अधिक मजबूत करणे हा या मॉक ड्रिलचा मुख्य उद्देश होता.




NAGPUR RURAL
POLICE
112


NAGPUR RURAL
POLICE
112


पोलिस स्टेशन



## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक, ०१ लाख १३ हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २१/०९/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी मौजा मागेमाहेरी टोल नाक्याजवळ पांडुणी सावनेर रोडवर नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी निखील गौतम चव्हाण, वय २७ वर्ष, रा. इंदोरा झोपडा, पंजाबी लाइन, चव्हाण आटा चक्की जवळ, जरीपटका, ता. जि. नागपुर,** हा मारूती सुझुकी डीझायर वाहन क्र एम एच ३१/इ क्यु—०८०३ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आली. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन १५.५ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती**

**१३,०८०/— रूपये, मारूती सुझुकी डीझायर वाहन क्र एम एच ३१ इ क्यु ०८०३ किंमती १,००,०००/—रूपये, असा एकुण १,१३,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. आरोपी निखील गौतम चव्हाण, वय २७ वर्ष, रा. इंदोरा झोपडा, पंजाबी लाइन, चव्हाण आटा चक्की जवळ, जरीपटका, ता. जि. नागपुर याचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २१/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वलनी जवळ हॅप्पी ढाबाचे बाजूला काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) मोहम्मद इरसाद मोहम्मद शफीउल्ला, वय ३८ वर्षे, राह. जाफरनगर राठोड लेआउट, जि. नागपूर २) तारिक अहमद खलिल अहमद, वय ३४ वर्षे, राह. जाफरनगर राठोड लेआउट जि. नागपूर ३) सैफ युसुफ खान, वय ३० वर्षे, राह. नेहरू कॉलनी जाफरनगर जि नागपूर, ४) सुफियान सगीर शेख, वय २३ वर्षे, राह जाफरनगर राठोड ले आउट नागपूर, ५) मुकीम परवेज शेख, वय ३७ वर्षे, राह. गोरेवाडा चौक, जि. नागपूर, ६) मोहम्मद मुबश्शीर अब्दुल रज्जाक, वय ३८ वर्ष, राह. सिदधार्थ नगर टेकानाका जि. नागपूर, ७) अब्दुल फैजल अब्दुल सलिम शेख, वय २६ वर्षे, राह. अग्रसेन चौक लोहारपुरा गांधीबाग जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते, रोख रक्कम किंमती ६५४०/—रूपये असा एकुण ६५६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १२ गुन्हे दाखल,

**दिनांक २१/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १२ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) मनसिंग नानकसींग टाक, वय ४० वर्ष, रा. गांगापुर झोपडपडडी टाकळघाट, ता. हिंगना, जि. नागपुर २) गनेश जगलुजी कठौते, वय २६ वर्ष, रा. वार्ड नं. २, हनुमान मंदीर टाकळघाट, ता. हिंगना, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे मनोज योगेश्वर कन्नके, वय ३२ वर्ष, रा. डोडमा, ता. कुही, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी नामे १) अनंता अजय लाखे, रा. राजाजी वार्ड, रामटेक २) प्रांजल संजिव ठाकरे, रा. गांधीचौक रामटेक यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी नामे १) तिलकचंदजी लक्ष्मन नरेटे, वय ४५ वर्ष, रा.देशमुखपुरा काटोल, जि. नागपुर २) प्रदीप किसनाजी मरस्कोल्हे, वय ३५ वर्ष, रा. पार्डी ता. कारंजा, जि. वर्धा ३) गजानन ज्ञानेश्वर पारिसे, वय २१ वर्ष, रा. पार्डी ता. कारंजा, जि. वर्धा ४) मनिष रामकृष्ण भलावी, वय २७ वर्ष, रा. पार्डी, ता. कारंजा, जि. वर्धा ५) आशिष नागदार पठान, वय ४१ वर्ष, रा. मुर्ती ता. काटोल ६) गजानन लक्ष्मणराव वाघमारे, वय ५२ वर्ष, रा. येतला धोटे, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** आरोपी नामे जाफर ईब्राहीम शेख, वय ५६ वर्ष, रा. धोतीवाडा, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ११२५० मिली देशी दारू, १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २२/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.










महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर